**एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांकरिता यशदा पुणे व वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थाकरिता मंजूर असलेल्या पदाच्या संरचनेत बदल व वेतनश्रेणी अवनत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- यशदा २०१८/प्र. क्र.११७/१२ अ**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- २६ डिसेंबर, २०१९

<u>वाचा -:</u> १. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:टीआरएन ०९/प्रक्र.३९/०९/१२-अ दि.२३.९.२०११
२. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक टीआरएन २०१३/प्रक्र.८४/१३/१२-अ दि.२०.१.२०१४
३.महासचालक, यशदा पुणे यांचे क्रमाक पदसंरचना/०५१७/२४१७/सीपीटीपी प्रशासन दि.२५.०६.२०१८.

**<u>प्रस्तावना:-</u>**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परिक्षेद्वारे सन २०१४ पासून सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या गट-अ व गट-ब मधील अधिकाऱ्यांसाठी अनुक्रमे यशदा पुणे व वनामती नागपूर येथे २ वर्षांचा एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करण्यास उक्त दि.२०.१.२०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता या दोन संस्थाकरिता प्रत्येकी १२ याप्रमाणे एकूण २४ पदे मंजूर करण्यात आली आहेत.

या पदांच्या पदनामात तसेच पद संरचनेत / श्रेणीत बदल करण्याचे यशदा यांनी त्यांच्या उक्त पत्रान्वये प्रस्तावित केले होते. त्यानुसार एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांकरिता यशदा, पुणे व वनामती नागपूर या प्रशिक्षण संस्थांकरिता मंजूर असलेल्या पदांच्या संरचनेत बदल व वेतनश्रेणी अवनत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:</u>**

एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ( CPTP ) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाबाबतच्या प्रशिक्षणासाठी यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा पुणे व वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन संस्था, ( वनामती ) नागपूर,या दोन संस्थाकरिता दि. २० १.२०१४ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येकी १२ पदे अश्या एकूण २४ मंजूर पदांकरिता खालीलप्रमाणे तक्त्यातील रकाना क्र २ मधील पदनाम व वेतनश्रेणी मध्ये बदल करून रकाना क्र. ४ नुसार पदसंरचनेच्या बदलास व सदर पदांची वेतनश्रेणी अवनत ( कमी ) करुन रकाना क्र. ७ व ८ मध्ये सातव्या वेतन आयोगानुसार नमूद केल्याप्रमाणे वेतनश्रेणीत बदल करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शासन निर्णय दि.२०.१.२०१४ अन्वये मंजूर पदे व वेतनश्रेणी | पद संख्या | पद संरचनेतील बदलानुसार शासन स्तरावर प्रस्तावित पदे | पद संख्या | वर्गवारी | सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर / Pay Level in Revised Pay Matrix | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | प्राध्यापक - अर्थशास्त्र<br>रु.३९०००-६५०००ग्रेड पे १०००० | २ | संचालक तथा सहायक प्राध्यापक (अर्थशास्त्र )<br>रु.१५६००-३९१००ग्रेड पे ७६०० | २ | अ | S-25 | ७८८००-२०९२०० |
| २ | प्राध्यापक - कायदा<br>रु.३९०००-६५००० ग्रेड पे १०००० | २ | सहायक प्राध्यापक ( कायदा )<br>रु.१५६००-३९१००ग्रेड पे ६६०० | २ | अ | S-23 | ६७७००-२०८७०० |
| ३ | प्राध्यापक - लोकप्रशासन<br>रु.३९०००-६५००० ग्रेड पे १०००० | २ | सहायक प्राध्यापक ( लोकप्रशासन)<br>रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | २ | अ | S-23 | ६७७००-२०८७०० |
| ४ | जनसंपर्क अधिकारी वर्ग-१<br>रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | २ | प्रशासकीय अधिकारी ( प्रशिक्षण व व्यवस्थापन )<br>रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | २ | अ | S-20 | ५६१००-१७७५०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | लेखाअधिकारी- वर्ग-१<br>रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० | २ | **लेखा अधिकारी- वर्ग-१<br>रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ५४००** | २ | अ | **S-20** | **५६१००-१७७५००** |
| ६ | संशोधन अधिकारी<br>रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | २ | **प्रकल्प अधिकारी<br>रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४४००** | २ | ब | **S-15** | **४१८००-१३२३००** |
| ७ | संशोधन सहायक<br>रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० | २ | **प्रकल्प सहायक<br>रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३००** | २ | क | **S-14** | **३८६००-१२२८००** |
| ८ | सहायक<br>रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० | ४ | **सहायक प्रशिक्षण<br>रु.९३००-३४८००ग्रेड पे ४३००** | ४ | क | S-14 | ३८६००-१२२८०० |
| ९ | लिपिक<br>रु.९३००-३४८०० ग्रेड पे ३५०० | ६ | **लिपिक/टंकलेखक<br>रु.५२००-२०२०० ग्रेड पे १९००** | ६ | क | S-6 | १९९००-६३२०० |
| १० | एकूण पदे | **२४** | | **२४** | | | |

३. सदर पदांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या व कार्यपध्दती याबाबतचे आदेश वेगळ्याने काढण्यात येत आहेत. सदर पदे भरण्याची कार्यवाही शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/ कार्यासन-१२, दि.१७.१२.२०१६ व शासन निर्णय सामान्य प्रशाससन विभाग क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्यासन-१२ दि.१६.२.२०१८ अन्वये प्रतिनियुक्तीने नियुक्तीसंदर्भात निश्चित करण्यात आलेल्या धोरणानुसार करण्यात येईल.

सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या अनौ. संदर्भ क्रमांक ८३८/कार्यासन-१२, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१९ तसेच वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्रमांक ४३९/सेवा-९ दि.३ डिसेंबर, २०१९ अन्वये मिळालेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९१२२६१२०९१००००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS RAMDAS THAKUR

Digitally signed by VILAS RAMDAS THAKUR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=cb156fb408217396128e8dcaeed3f6fa70d9fd209eb9efc83bdd68b30 8614534, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=c8b1e52c5c4f922ab6eb7a0b44101c838aea34f29fbff0aebe9d 85c3de3468c2, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VILAS RAMDAS THAKUR
Date: 2019.12.26 14:59:08 +05'30'

**( वि.रा. ठाकूर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२ मुंबई/ नागपूर,
२. प्रधान सचिव , वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई -३२
३. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे,
४. उपमहासंचालक, सीपीटीपी, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे,
५. उपसचिव, वित्त विभाग ( सेवा ९), मंत्रालय, मुंबई -३२,
६. उपसचिव, वित्त विभाग ( सेवा ९), मंत्रालय, मुंबई -३२,
७. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग/ का.१२, मंत्रालय, मुंबई -३२
८. संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन संस्था, ( वनामती ) नागपूर,
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर.
१०. लेखाधिकारी, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा पुणे.
११. लेखाधिकारी, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन संस्था, ( वनामती ) नागपूर,
१२. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन- सीपीटीपी-अ / सीपीटीपी-ब, मंत्रालय, मुंबई -३२,
१२. कार्यासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन- सीपीटीपी /सीपीटीपी-अ / सीपीटीपी-ब मंत्रालय, मुंबई -३२,
१३. अपर मुख्य सचिव ( सेवा ) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२,
१४. निवड नस्ती कार्यासन - १२-अ.